पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक :- ०७/१२/२०२०

# ऑपरेशन-मुस्कान -९ अंतर्गत गडचिरोली जिल्हयातील हरविलेल्या इसमांचा शोध सुरु

- ***“शोध पथकाद्वारे” गडचिरोली पोलीस दलातील पथके घेत आहेत हरविलेल्या इसमांचा शोध***

दिनांक-१ डिसेंबर २०२० ते ३१ डिसेंबर २०२० पर्यंत गडचिरोली पोलीस दलाच्या वतीने ऑपरेशन मुस्कान मोहीम-९ राबविण्यात येत असुन, या मोहीमे अंतर्गत गडचिरोली जिल्हयातील पोस्टे, उपपोस्टे व पोमके येथे नोंद झालेल्या तक्रारीनुसार हरविलेल्या इसमांचा शोध घेण्यात येणार आहे.

यासाठी गडचिरोली पोलीस दलाच्या वतीने मा.पोलीस अधीक्षक श्री.अंकित गोयल तसेच मा. अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन) श्री. समीर शेख यांचे मार्गदर्शनाखाली सर्व पोस्टे, उपपोटे व पोमके येथे “विशेष शोध पथक” तयार करण्यात आले आहे. हया विशेष शोध पथकाच्या माध्यमातुन सन २०१५ ते डिसेंबर २०२० या कालावधीत भादंविचे कलम ३६३ ते ३६९ नुसार हरविलेल्या महिला, अपनयन, व अपहरण व्यक्ति यांचा शोध घेतला जाणार आहे. या शोधपथकातील अधिकारी, कर्मचारी हे दिनांक-०१/१२/२०२० ते ३१/१२/२०२० पर्यंत मुलांचे आश्रमगृह, अशासकीय संस्था, रेल्वे स्थानके, बसस्थानके, रस्त्यावर भीक मागणारी मुले, धार्मिक स्थळे, रुग्णालये, हॉटेल्स, दुकाने इत्यादी ठिकाणी काम करणारी मुले अशा मुलांची चौकशी करुन, फोटो घेवून चौकशी अंती, त्या मुलांना त्याच्या आई-वडीलांच्या स्वाधिन करण्यात येणार आहे.

तसेच मा. पोलीस अधीक्षक श्री अंकित गोयल यांनी सर्व जनतेस आवाहन केले आहे की, आपले आजुबाजुचे परिसरात अशा प्रकारची लहान मुले, मुली काम करीत आहेत किंवा त्यांचे पालकांबाबत संशय वाटत असल्यास त्यांनी संबंधित पोस्टेला माहीती दयावी. जेणे करुन त्यांचे माहीतीची पडताळणी करुन पुढील कायदेशिर प्रक्रिया पार पाडता येईल.

ऑपरेशन मुस्कान-९ अंतर्गत संपुर्ण महाराष्ट्रात सुरु असलेल्या शोध मोहीमेस सर्वानी सहकार्य करावे.